## मराठी विभाग ( थोडक्यात परिचय )

ना.ग.आचार्य व दा.कृ.मराठे महाविद्यालयाच्या वरिष्ठ महाविद्यालयातील मराठी विभागाची *स्थापना जुलै १९८२* मध्ये झाली. या कालावधीपासून मराठी भाषा, साहित्य व संस्कृती या क्षेत्रात या विभागाचे महत्त्वपूर्ण योगदान राहिले आहे. मुंबई विद्यापीठाच्या क्रमिक अभ्यासक्रमाचे नियमित व चांगल्या दर्जाच्या निकालासह असलेले अध्यापन, सातत्यपूर्ण चर्चासत्रे, व्याख्यानमाला, मराठी वाङ्मय मंडळाचे वेगवेगळ्या प्रकारचे सातत्यपूर्ण अनेक कार्यक्रम, विद्यार्थ्यांशी सातत्यपूर्ण सुसंवाद तसेच त्यांचा कृतीशील सहभाग ही या विभागाची काही प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. विद्यार्थ्यांच्या भाषा कौशल्यांचा विकास, वाङ्मयीन व सौंदर्यात्मक अभिरूचीची अभिवृद्धी, मराठी साहित्य परंपरेच्या परिचयातून त्यांच्या सामाजिक भानाची जडणघडण तसेच विविध विचारप्रवाहांच्या परिचयातून घडणारे चिकित्सक मूल्यभान ही या विभागाची मुख्य उद्दिष्टे आहेत.

*या विभागात* एक पूर्णवेळ व्याख्याता – प्रा.ज्योती रोटे,एम.ए व नेट (१९९९) व एम.फिल.(२००४) कार्यरत असून सध्या या मुंबई विद्यापीठात *लोकप्रिय कादंबरी- स्वरूप व प्रेरणा* या विषयावर पी.एच.डी या पदवीकरिता संशोधन करत आहेत. याशिवाय प्रा.सायली देवरे, (ना.ग.आचार्य व दा.कृ.मराठे महाविद्यालय, मराठी विभागाच्या माजी विद्यार्थीनी) एम.ए. ( सुवर्ण पदकासह ),नेट, या तासिका तत्त्वावरील पदावर कार्यरत होत्या. सध्या प्रा. रोहिणी कदम, एम.ए., सेट, या तासिका तत्त्वावरील पदावर कार्यरत आहेत. सर्वच व्याख्याते सतत वेगवेगळ्या उपक्रमांतून मराठी साहित्य अध्यापनाच्या क्षेत्रात योगदान देत असतात. महाविद्यालयात कला शाखेतील पदवी पातळीवर तीनही वर्षांकरिता हा विषय अभ्यासता येतो. प्रथम वर्ष (अनिवार्य), प्रथम वर्ष (विशेष अभ्यास), द्वितीय वर्ष (अभ्यासपत्रिका क्र.२ व ३-विशेष अभ्यास), तृतीय वर्ष (अभ्यासपत्रिका क्र.४,५ व ६-विशेष अभ्यास) असे या विषयाच्या अभ्यासपत्रिकांचे स्वरूप आहे.

*साहित्येतिहासाच्या बदलत्या संकल्पना* हे विद्यापीठ अनुदान आयोग अनुदानित राष्ट्रीय चर्चासत्र (जाने. २०१८),*कवितेची समीक्षा : काही परिमाणे* हे विद्यापीठ अनुदान अनुदानित राज्यस्तरीय चर्चासत्र (जाने.२०११), *साहित्य आणि समाज : अभ्यासाच्या दिशा* (२००८), *बंध- अनुबंधच्या निमित्ताने* (२००६) व *दुर्गा भागवत स्मृती चर्चासत्र* (२००४) अशा सर्व चर्चासत्रांचे आयोजन विभागाचे मराठी अभ्यासक्षेत्रातील स्थान अधोरेखित करते. स्व.श्री.शरदभाऊ आचार्य स्मृती व्याख्यानमाला (२०१२ पासून सलग) ही देखील विभागाची विद्याक्षेत्रीय पातळीवरील महत्त्वाची ओळख आहे. ही चर्चासत्रे व व्याख्यानमालेच्या निमित्ताने अनेक मान्यवर अभ्यासक व लेखकांनी या महाविद्यालयात

येऊन अर्थपूर्ण चर्चा केली आहे. डॉ.म.सु.पाटील, डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, डॉ. रेखा इनामदार – साने, डॉ. राजा दीक्षित, डॉ. हरिश्चंद्र थोरात, डॉ. वसंत पाटणकर, डॉ. मिलिंद मालशे, डॉ.विजया राजाध्यक्ष, डॉ. वसंत आबाजी डहाके, प्रा. दिगंबर पाध्ये, डॉ. प्रकाश परब, डॉ. प्रतिभा कणेकर, डॉ. अनिल सपकाळ, प्रा. पुष्पा भावे, प्रा. मीना गोखले, प्रा.अनंत भावे, प्रा.नितीन रिंढे, डॉ.रामदास भटकळ, श्री. हरिश सदानी, श्री.निळू दामले, प्रा. मोहन आपटे, डॉ.बाळ फोंडके, डॉ. विजया वाड, प्रा. दाउद दळवी, श्री. वामन होवाळ, श्री.सतीश तांबे, श्री. रमेश इंगळे उत्रादकर, श्री. माधव जोशी, श्री. सुनिल कांबळे, कविवर्य- वसंत गुर्जर, श्री. अशोक नायगांवकर, श्रीमती नीरजा, डॉ. प्रज्ञा दया पवार, श्री.मंगेश काळे, कवी चंद्रशेखर सानेकर, श्री. जयंत पवार, श्रीमती प्रतिमा जोशी, डॉ. निरज हातेकर, डॉ. राजन पडवळ, डॉ. अशोक चौसाळकर, श्री. राम जगताप, डॉ. अजित रानडे, श्रीमती नीला उपाध्ये, श्री. गिरीश कुबेर इ. यातील काही निवडक लेखक, अभ्यासक मंडळी होत.

मराठी वाङ्मय मंडळाचा दरवर्षी उद्घाटनाचा *वाचनसंस्कृती या विषयाला वाहिलेला कार्यक्रम, सातत्याने होणाऱ्या कवितावाचन, वक्तृत्व, काव्यरसास्वाद व अभिवाचन स्पर्धा, विद्यार्थ्यांचे कविसंमेलन, वाचनसंस्कार या विषयसूत्रावर आधारित तीन कार्यशाळा, दिंडी हे भित्तिपत्रक* इ.काही महत्त्वाच्या घटना होत.

अमराठी भाषिक विद्यार्थ्यांकरिता, त्यांना मराठी भाषेचा परिचय व्हावा, मराठी भाषा व संस्कृती याच्या परिचयाव्यतिरिक्त विशेषत: स्पर्धा परीक्षांकरिता आवश्यक मराठी भाषेची किमान तोंडओळख व्हावी या उद्देशाने विभाग मराठी भाषा परिचय प्रमाणपत्र - (Marathi Department Certificate Course) - अमराठी भाषिक विद्यार्थ्यांकरिता विशेष प्रमाणपत्र अभ्यास (२०२२ - २०२३ पासून) चालवते.

मराठी विभाग येत्या काळात  स्वतंत्रपणे भाषांतर, संस्कृतीअभ्यास व लोकप्रिय साहित्य या विषयांवर आधारित छोटे अभ्यासक्रम सुरू करण्याच्या दृष्टीने विचाराधीन आहे.

****

*